कुक्कुटपालन

# अंडी देणाऱ्या कोंबड्यांची लक्षणे आणि त्यांची जोपासना



**डॉ. कल्याणी सरप**
(मो.नं. ९०९६८७०५५०)
**डॉ. व्ही.जी. अतकरे**
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
कृषी महाविद्यालय, नागपूर

अंड्यातून मिळणारा नफा कोंबड्यांच्या अंडी देण्याच्या क्षमतेवर अवलंबून असतो. अंडी देण्याचे प्रमाण जितके जास्त तितका अधिक नफा मिळतो. त्यामुळे कोंबडी पालनासाठी जास्त प्रमाणात अंडी देणाऱ्या कोंबड्या ठेवणे फायदेशीर ठरते. कोंबड्या जेव्हा अंड्यावर येतात तेव्हा तुरा व गलोल यांना रक्ताचा पुरवठा जास्त होतो. या रक्त पुरवठ्यामुळे तुरा व गलोल यांची वाढ होते. त्यांचा आकार मोठा होऊन हात लावल्यास तो गरम लागतो, तुरा व गलोल लाल व तजेलदार दिसतो. याउलट अंडी देण्याचे थांबल्यावर या अवयवांना रक्ताचा पुरवठा कमी होतो व त्यामुळे आकुंचन पावून ते निस्तेज दिसतात. त्यांच्यावर पांढरी भुकटी जमा होते. हात लावल्यास ते अवयव गार लागतात. कोंबडी अंड्यावर आल्यावर अंडे सहज रीतीने बाहेर निघावे यासाठी गुदद्वाराच्या दोन्ही बाजूस असलेल्या हाडांमधील अंतर वाढते. जसे जसे अंडी देण्याचे प्रमाण वाढते तशी तशी या हाडांमध्ये असलेली चरबी कमी होत जाऊन या हाडांची टोके स्पष्टपणे हाताला लागतात.

**खाद्याची गरज वाढते :** कोंबड्यांनी अंडी देणे सुरु केल्यावर त्यांची भूक वाढते व त्यामुळे त्यांना जास्त खाद्य लागते. कोंबडी अंड्यावर नसताना स्टर्नमपासून गुदद्वाराच्या दोन्ही बाजूला हाडापर्यंतचे अंतर २ ते ३ बोटांच्या रुंदी इतके असते, मात्र कोंबडी अंड्यावर आल्यावर ते अंतर ४ ते ५ बोटांच्या रुंदीपेक्षाही जास्त असते. जास्त अंडी देणाऱ्या कोंबड्यांची पाठ रुंद असते त्याचप्रमाणे छातीची खोली भरपूर असते. जास्त अंडी देणाऱ्या कोंबड्या दिवसभर उद्योगी आढळतात. सतत पायाने उकरून खाली काही खाद्य मिळते का ते पाहण्यात दंग असतात. यामुळे पायांची व नखांची झीज होऊन ती लहान व बोथट झालेली दिसतात. याउलट कमी अंडी देणाऱ्या कोंबड्या आराम करताना आढळतात. त्यांची चोच लांब व अणुकुचीदार असते, पायांची नखे मोठी व तीक्ष्ण आढळतात. या लक्षणांच्या व्यतिरिक्त ज्या कोंबड्या लवकर वयात येतात त्या कोंबड्यांचे अंडोत्पादन जास्त असते. जास्त अंडी देणाऱ्या कोंबड्यांची पिसे विसकटलेली असतात तसेच तुटलेली व भुरकट दिसतात. याउलट कमी अंडी देणाऱ्या कोंबड्यांची पिसे तुकतुकीत व चांगली दिसतात.

कोंबड्या अंड्यावर आल्यावर त्यांना शक्यतोवर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवू नये. त्याचप्रमाणे त्यांच्या खाद्यात फारसा बदल करू नये. असा बदल झाल्यास कोंबड्यांच्या डोक्यावरील व मानेवरील पिसे गळण्यास सुरुवात होते व अंडोत्पादन काही दिवसांकरिता बंद होते.

**ताजे व पुरेसे पाणी आवश्यक :** कोंबड्यांना समतोल व भरपूर खाद्य मिळणेही आवश्यक आहे. त्यासाठी खाद्याच्या व पिण्याच्या भांड्यावर गर्दी होणार नाही; सर्वांना खाद्य- पाणी भरपूर मिळते का हे पाहणे आवश्यक आहे. तसेच खाद्याबरोबर स्वच्छ व ताजे पाणी मिळणे आवश्यक आहे. एक दिवस जरी पाण्याच्या पुरवठा अपुरा झाल्यास अंड्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. उन्हाळ्यात कोंबड्यांना मातीच्या भांड्यातून पाणी द्यावे. आकस्मिक होणारा कोणताही बदल, अस्वच्छ वातावरण, कृमी- कीटकांचा प्रभाव या गोष्टींचा अंडी उत्पादनावर परिणाम होतो. यासाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. कोंबड्या अंड्यावर आल्यावर प्रकाशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढवत रहावे, कमी करू नये. कमी झाल्यास अंडोत्पादनावर परिणाम होतो. जानेवारीच्या अखेरीस एका दिवसाची पिल्ले विकत घेतल्यास पाच महिन्यांनी म्हणजे जूनच्या शेवटी त्या अंड्यावर येतील. जूनच्या शेवटच्या आठवड्यातील दिवस सर्वात मोठे असतात. त्यानंतर दिवस हळूहळू लहान होत जाऊन डिसेंबरच्या शेवटी सर्वात लहान होतात. यासाठी कोंबड्यांना कृत्रिम प्रकाश द्यावा- म्हणजे अंड्याचे उत्पादन जास्त मिळेल व त्यापासून आर्थिक लाभ अधिक होईल. जिथे वीज उपलब्ध असेल तिथे सूर्योदयाच्या अगोदर किंवा सूर्यास्तानंतर कृत्रिम प्रकाश मिळून २४ तासांचा दिवस करावा. डिसेंबर अखेरपर्यंत १८ तासांचा करावा- म्हणजे जून अखेरपासून डिसेंबर अखेरपर्यंत २४ आठवड्यांत कृत्रिम प्रकाश ४ तासांनी वाढवावा. यासाठी शेवटी १४ तासांचा दिवस करून दर आठवड्यात १० मिनिटांनी दिवस कृत्रिमरितीने वाढवत जावा. ■